# ऋ_ण_ नि_र्दे_श

प्रस्तुतचा शोधप्रबंध सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे. अनेकांच्या प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मदतीतून प्रबंधपूर्तीचा प्रवास पुरा करू शकलो. या शोधप्रबंधाच्या पूर्ततेसाठी माझे मार्गदर्शक डॉ. श.नि. पवार, समाजशास्त्र विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे आत्यंतिक मोलाचे व उत्स्फुर्त मार्गदर्शन लाभले. त्यांच्या सहकार्यामुळेच ह्या शोधप्रबंधाचा प्रवास पुरा होवू शकला म्हणून त्यांच्या ऋणातून मुक्त होण्यापेक्षा त्यांच्या ऋणातच राहण्यात मला अधिक आनंद वाटतो.

तसेच ना.बा. शिक्षण संस्थेच्या श्री. व्यंकटेश महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. ए.बी. कासार, इचलकरंजी यांचे मला सर्वोतपरी सहकार्य लाभले त्याबद्दल मी त्यांचा व्यक्तिशः ऋणी आहे.

याशिवाय डॉ. आर.बी. पाटील, डॉ. जे.बी. अंबेकर, प्रा. एस.एस. दहिवाले, प्रा. एम.एम. आवटे, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे मला बहुमोल मार्गदर्शन लाभले. तसेच शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथालयातील सर्व पदाधिकारी व सेवक वर्ग व खास करून उपग्रंथपाल डॉ. जे.बी. जाधव यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे.

शेतकरी सहकारी संघ लि., कोल्हापूरचे अध्यक्ष वि.शं.शिंदे नेसरीकर व तसेच कार्यकारी संचालक श्री. वसंतराव तात्यासाहेब मोहिते व संघातील इतर पदाधिकारी व सेवक वर्ग यांच्याकडून वेळोवेळी लाभलेल्या

सहकार्यानेच हा प्रबंध मी पूर्ण करू शकलो म्हणून मी त्यांचा पण ऋणी आहे.

सहकारी प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूरचे प्राचार्य श्री. जयसिंगराव हवालदार व त्यांचे सहकारी प्राध्यापक यांचा पण मी आभारी आहे. तसेच सौ. शांताबाई माधवराव पाटील यांचेही सहकार्य मला या शोधप्रबंधाकामी लाभले म्हणून मी त्यांचाही आभारी आहे.

तसेच हा शोधप्रबंध पूर्ण करण्यास माझे मित्र प्रा. संपतराव नलवडे, प्रा. सुरेश गवळी, प्रा. अशोक जोशी, प्रा.जी.एम्. चोंदे, प्रा. प्रकाश कुंभार, प्रा. पी.एच. साळोखे, प्रा. विलास यादव, प्रा. सर्जेराव साळोखे (रत्नागिरी) श्री. मनोहर झिरंगेसर, श्री. अनिल कोगनोळे आणि माझे बंधू श्री. वर्धमान उपाध्ये व पोपट उपाध्ये यांचे बहुमोल सहकार्य लाभले आणि खास करून डॉ. आर.जी. कापसे यांचेही अनमोल सहकार्य लाभले म्हणून मी त्यांचा ऋणी आहे.

तसेच श्री. बाळासाहेब कवडे यांनी या शोधप्रबंधाचे टंकलेखन वेळेत व सुबक केले याबद्दल त्यांचाही मी ऋणी आहे.

शेवटी माझ्या पत्नी सौ. सुजाता उपाध्ये यांच्या सहकार्याचा उल्लेख करणे आवश्यकच आहे.

(व.आ. उपाध्ये)